जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -१९९ दिनांक - २६/०३/२०२५**

लष्कर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## स्वतःच्या मावशीच्या घरात चोरी करणा-या चोराच्या अवघ्या तीनच तासात आवळल्या मुसक्या

फिर्यादी ह्या त्यांचे राहते घराचा दरवाजा ओढुन घेवुन त्यांचे मुलीचे घरी गेले असताना अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांचे घरात प्रवेश करून घरातील लोखंडी कपाटातुन सोन्याचे दागिणे व रोख रक्कम असा १,२२,०००/- चा ऐवज चोरून नेला म्हणुन यातील फिर्यादी यांनी लष्कर पोलीस स्टेशन, येथे तक्रार दिल्याने अज्ञात इसमाविरूध्द गुन्हा रजिस्टर क्र. ५३/२०२५, भा.न्या.सं. कलम ३०५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

दाखल गुन्ह्यातील अज्ञात चोरट्याचा शोध घेत असताना, फिर्यादी यांचे घराजवळील बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी नामे **किरण राजेश कुंटे वय २८ वर्षे धोबी घाट कॅम्प पुणे** याच्याकडे त्यास विश्वासात घेवुन तपास केला असता, त्याने त्याची मावशी फिर्यादी यांच्या घरी पाणी पिण्याच्या बहाण्याने आला असता, त्याला त्याच्या मावशीचे घराचे दरवाजे उघडे असल्याचे दिसले. त्याने गुपचुप चोरीच्या उद्देशाने घरात प्रवेश करून घरातील लोखंडी कपाट उघडुन त्याच्या ड्रॉव्हर मध्ये ठेवलेले वरीलप्रमाणे सोन्याचे दागिने व रोख रक्कम १०,०००/-रू. चोरल्याने तपासात निष्पन्न झाले आहे. त्याच्याकडुन चोरी केलेली सर्व सोन्याचे दागिने रोख रक्कम हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री, प्रविणकुमार पाटील मा.पोलीस उप आयुक्त, परि-२,श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहा.पोलीस आयुक्त,लष्कर विभाग,श्री.दिपक निकम, लष्कर पोलीस स्टेशनचे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री.गिरीश कुमार दिगांवकर ,पोलीस निरिक्षक(गुन्हे),श्री.प्रदिप पवार यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उप निरिक्षक राहुल घाडगे,पोलीस अंमलदार महेश कदम, सोमनाथ बनसोडे, संदिप उकिरडे,प्रविण गायकवाड,लोकेश कदम,सागर हराळ,महिला पोलीस अंमलदार अलका ब्राम्हणे यांनी केली आहे.